खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या जागा प्रत्यार्पीत करुन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या जागांमध्ये झालेली वाढ यास शासन मान्यता देणे बाबत...

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमईडी १०२०/ प्र.क्र.६७ /२०/शिक्षण-२ (२)
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक : २२ एप्रिल, २०२०

वाचा :

१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/केंद्रशासन/ पदविका/ रुपांतरीत/ न.क्र.३३५/ २०१९/२-अ, दिनांक०२.०३.२०२०
२) बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक MCI-२३(१) / (Conversion)./२०१९-Med./१९५४१२, दिनांक २७.०२.२०२०
३) भारतीय आयुर्विज्ञान परिषद,नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रमांकMCI-१८(१)/२०१८-Med./१२२२९४., दिनांक १२.०७.२०१८

प्रस्तावना :

मान्यताप्राप्त (Recognised) पदविका अभ्यासक्रमांच्या जागा प्रत्यार्पीत करुन त्याबदल्यात तेवढ्याच जागांचे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांमध्ये रुपांतर करण्यास संदर्भाधीन क्रमांक ३) वरील अधिसुचनेनुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विनियमनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील काही खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या बदल्यात संबधित विषयाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या जागांमध्ये वाढ करण्यास मान्यता दिली असल्याचे बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांचे संदर्भाधीन दिनांक २७.०२.२०२० रोजीच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे. अशा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या बदल्यात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या जागांमध्ये झालेली वाढ याकरीता शासनमान्यता देण्याचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने संदर्भाधीन दिनांक ०२.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला होता. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्यामार्फत प्राप्त प्रस्तावानुसार आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned by CamScanner

शासन निर्णय: बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांचे दिनांक २७.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार सदर शासननिर्णयासोबतच्या सहपत्र "(अ)" मध्ये नमूद केलेल्या खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या जागांच्या प्रत्यार्पणाच्या परिणामी संबंधित वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत झालेली वाढ यास शासनमान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खाली अटी/शर्ती यांच्या अधिन राहील.

२. अटी:-

१) सदर महाविद्यालयांमध्ये त्यासमोरील पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता Board of Governors, भारतीय आयुर्विज्ञान परिषद यांनी निर्धारित केल्यानुसार सहपत्र "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

२) राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा, मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) शासकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

७) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

८) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्रधिकरण, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्रधिकरण, मुंबई यांच्याकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील



Scanned by CamScanner

१.) उक्त पदव्युत्तर अभ्यासक्रमास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्निकरण प्राप्त करुन घेण्यात यावे व तद्नंतर प्रवेश करण्यात यावेत.

३. सदर आदेश भारतीय आयुर्विज्ञान परिषदेनें संदर्भाधीन पत्रांन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अजित सासुलकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.
सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता, सर्व संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालये (संचालनालयामार्फत).
निवडनस्ती (शिक्षण-२)



Scanned by CamScanner

शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक एमईडी-२०२०/ प्र.क्र.६७/शिक्षण-२ (२),

दिनांक - २२ एप्रिल, २०२० सोबतचे सहपत्र "अ"

| Sr. No. | College Name | Govt. /Corp/Pvt | Course | Seat | Degree seat Increase |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ACPM Medical College Dhule | PVT | Diploma in Obstetrics & Gynaecology | 1 | 2 to 3 |
| | | PVT | Diploma in Orthopaedics | 2 | 2to 4 |
| 2 | Postgraduate Institute of Swasthiyog Pratisthan, Miraj, Dist. Sangali | PVT | Diploma in Orthopaedics | 2 | 2 to 4 |
| 3 | Sanjeevan Medical Foundation ENT Post Graduate Training Instt. Miraj, Dist. Sangali | PVT | Diploma in Oto-Rhino-Laryngology | 2 | 1 to 3 |
| 4 | Smt Kashibai Navale Medical College And General Hospital, Pune | PVT | Diploma in Clinical Pathology | 2 | 5 to 7 |
| | Total | | | 9 | |